दै. "ॲग्रोवन" दि. २९/११/२०२१.

# अंजीर, सीताफळाच्या निर्यातीसाठी प्रयत्न

## पुरंदरच्या शेतकऱ्यांचा पुढाकार; बायर क्रॉप सायन्सेस कंपनीचे सहकार्य

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : कोणत्याही शेतीमाल निर्यातीसाठी निर्यातदार देशांच्या गरज आणि मागणीनुसार पीक पद्धतीमध्ये बदलांची गरज असते. यानुसार द्राक्ष आणि डाळिंब या पिकांवर काम केले गेले. मात्र आता द्राक्ष, डाळिंबाबरोबरच अंजीर आणि सीताफळाच्या निर्यातीसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहेत. यासाठी पुरंदर तालुक्यातील तरुण शेतकरी एकत्रित येऊन प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना बायर क्रॉप सायन्सेस कंपनीचे पाठबळ मिळत आहे. या पाठबळावर आणि पणन मंडळाच्या मार्गदर्शनाखाली लवकरच निर्यात सुरू होईल, असा विश्वास पणन संचालक आणि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी व्यक्त केला.

वाघापूर (ता. पुरंदर) येथे पुरंदर हायलँड फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी आणि जर्मनीमधील बायर क्रॉप सायन्सेस यांच्यामध्ये नुकताच करार करण्यात आला. या वेळी पणन संचालक सुनील पवार, निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक दिलीप झेंडे, बायर क्रॉप सायन्स अन्न साखळी विभागाचे महाराष्ट्राचे व्यवस्थापक गणेश साळुंके, बायर क्रॉप पुणे शीतकरणचे व्यवस्थापक अंकुश साबळे, 'पुरंदर हायलॅंड्स'चे अध्यक्ष रोहन उरसळ, ज्येष्ठ नेते सतीश उरसळ, तालुका कृषी अधिकारी सूरज जाधव, शहाजी कुंजीर, नामदेव कुंजीर, कैलास जाधव, रोहिदास डोंबे, संजय कोरडे आदी उपस्थित होते.

या वेळी झेंडे म्हणाले, "कोणत्याही शेतीमालाच्या मूल्यवर्धनातून त्याला अधिकचे दर मिळत असतात. यामध्ये प्रामुख्याने निर्यातक्षम उत्पादनातून परकीय चलन मिळते. पुरंदरच्या पोषक वातावरणामुळे अंजीर, सीताफळाचे दर्जेदार उत्पादन होत आहे. या हवामानाचा फायदा घेत, पीक पद्धतीमध्ये बदलांची गरज आहे. त्यासाठी कृषी विभाग शेतकरी कंपनीला मदत करेल." बायर क्रॉपचे गणेश साळुंके म्हणाले, "शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने एकत्रित येऊन दर्जेदार शेतीमाल उत्पादनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील सल्ला आणि मार्गदर्शन करणार आहोत."

> जागतिक पातळीवर शेतीमालाची ओळख वैशिष्ट्यपूर्ण हवामानानुसार होते. पुरंदरच्या अंजिराला जीआय मानांकन मिळाले असून, त्याच्या प्रोत्साहनासाठी पणन मंडळाच्या वतीने शेतकरी गट, उत्पादक कंपन्या यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या योजनेअंतर्गत अंजिरासाठी देखील प्रशिक्षण कार्यक्रम सुरू आहेत.
> **–सुनील पवार, कार्यकारी संचालक, पणन मंडळ**

दै. "महाराष्ट्र टाईम्स" दि. २५/११/२०२२.

# बाजार समितीच्या निवडणुका लांबणीवर

**औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाचा परिणाम**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

परभणीतील जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीबाबत औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशानंतर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुका झाल्यानंतर बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याचे आदेश काढले आहेत. त्यामुळे बाजार समितींच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत.

राज्यात ३०६ बाजार समित्या आहेत. त्यापैकी २६६ बाजार समित्यांच्या निवडणुका होणार होत्या. मात्र, या निवडणुकांची प्रक्रिया स्थगित झाली आहे. परभणीतील जिंतूर बाजार समितीबाबत औरंगाबाद खंडपीठाने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुका झाल्यानंतर बाजार समितीच्या निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर प्राधिकरणाचे सचिव यशवंत गिरी यांनी बाजार समित्यांच्या निवडणुका रद्द करण्याबाबतचे आदेश काढले आहेत.

बाजार समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदारयादी दहा नोव्हेंबरला प्रसिद्ध करून दहा ते २२ नोव्हेंबर या दरम्यान मतदारयादीवर हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या. ही प्रक्रिया रद्द करण्यात येत असल्याचे गिरी यांनी आदेशात स्पष्ट केले आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुकांनंतर निवडणुकीस पात्र असलेल्या बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याबाबत प्राधिकरणाकडून स्वतंत्र आदेश काढण्यात येणार आहेत, असे गिरी यांनी आदेशात नमूद केले आहे.



### जिल्ह्यातील आठ बाजार समित्या

जिल्ह्यातील नीरा, खेड, जुन्नर, मंचर आणि भोर या बाजार समित्यांच्या निवडणुकांसाठी १६ डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार होती. या बाजार समित्यांच्या प्रारूप मतदारयाद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. बारामती, दौंड आणि इंदापूर या बाजार समित्यांच्या निवडणुकांच्या मतदारयाद्या तयार करण्याचे काम सुरू आहे. या समित्यांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली असताना पुन्हा एकदा या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत.

### तीन महिन्यांनंतर निवडणुका?

करोनाचा प्रादुर्भाव वाढल्यानंतर राज्यातील बाजार समित्यांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यानंतर या निवडणुकांवरील स्थगिती उठविण्यात आली. प्राधिकरणाने १६ डिसेंबर २०२१ ते १७ जानेवारी २०२२ या कालावधीत बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याचे जाहीर केले. त्यानंतर मतदारयाद्या तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले. आता विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुकांनंतर बाजार समित्यांच्या निवडणुका होणार आहेत. राज्यात सुमारे २१ हजार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आहेत. त्यापैकी सुमारे १७ हजार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. या निवडणुका घेण्यासाठी किमान तीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

Kesari 22/01/2022

# कृषिमालाच्या समुद्रमार्गे निर्यातीकरिता वाहतुकीसाठी अर्थसहाय्य योजना

काही देशांचे अंतर भारतापासून जास्त असल्याने फळे व भाजीपाला विमानमार्गे निर्यात होतात. वाहतुकीकरिता विमानाचे भाडे जास्त असते. त्यामुळे परदेशी बाजारपेठेत माल जास्त दराने विकावा लागतो. यावर समुद्रमार्गे निर्यात करणे हा पर्याय उपलब्ध आहे. तथापि सदर माल समुद्रमार्गे निर्यात करावयाचा असल्यास वेळ जास्त लागतो. फळे व भाजीपाला नाशवंत स्वरुपाची असल्याने निर्यातदार समुद्रमार्गे निर्यात करायला तयार होत नाही. यामुळे समुद्रमार्गे काही कृषिमाल समुद्रमार्गे निर्यातीस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातून कृषिमालाच्या निर्यातीस जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळावे, यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत कृषिमालाच्या निर्यातवृद्धीकरिता समुद्रमार्गे आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी अनुदान देणेबाबतची योजना प्रस्तावित होती. महाराष्ट्रातून कृषिमालाच्या निर्यातीस जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळावे, यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, फर्म, सहकारी संस्था, निर्यातदार यांचा निर्यातीमध्ये थेट सहभाग वाढविणेचे दृष्टीने कृषि पणन मंडळामार्फत समुद्रमार्गे निर्यातीकरिता वाहतुकीसाठी अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे.

# बाजार समिती कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यात पणन संचालनालयाने काही महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित केलेले आहेत. प्रशासकीय मंडळ सदस्यांच्या संख्येला नसलेला ब्रेक प्रथमच लावण्यात आला असून, पाच सदस्यांपर्यंतच ही संख्या मर्यादित ठेवण्याचा बदल सुचविण्यात आला आहे. तर, बाजार समितीवर अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीद्वारे सचिव नियुक्ती करण्याच्या बदलाचाही समावेश आहे.

- अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीद्वारे समित्यांवर सचिव येणार
- देखरेख खर्च शेकडा पाच पैशांवरून दहा पैसे करण्याचा विचार

बाजार समितीच्या कायद्यात कृषी पतसंस्था, बहूद्देशीय पतसंस्था असा उल्लेख आहे. त्याऐवजी पीक कर्ज वाटप करणाऱ्या बहूद्देशीय संस्था असा बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. बाजार समितीवर प्रशासक मंडळ नेमण्याची कायदेशीर तरतूद आहे. मात्र, अशा शासननियुक्त प्रशासक मंडळाच्या संख्येला कोणतीच मर्यादा नव्हती.

राजकीय दृष्ट्या सोयीच्या वाटणाऱ्या कार्यकर्त्यांची वर्णी लावून प्रशासकीय मंडळावर नको तितक्या संचालकांना नेमण्यावर भर दिला जात होता. मात्र, प्रस्तावित बदलामध्ये बाजार समितीवर पाच सदस्यांचेच प्रशासकीय मंडळ नेमण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

राज्य कृषी पणन मंडळाकडून बाजार समित्यांसाठी सचिव पॅनेल घोषित करण्याची तरतूद आहे. सध्या पॅनेल अस्तित्वात नाही. बाजार समित्यांवर सचिव नेमण्याबाबत विचार करण्यात यावा, असे निर्देश उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेले आहेत. त्यानुसार पॅनेलची तरतूद वगळून बाजार समिती कर्मचाऱ्यांमधूनच पदोन्नतीने सचिवांच्या नेमणुकीचे नियम प्रस्तावित करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

याशिवाय समित्यांवर निबंधक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यांची सचिव म्हणून नेमणूक करण्याबाबतची तरतूद कायद्यात आहेच; परंतु या तरतुदींमध्ये बदल करून सहकार अधिकारी श्रेणी दोन या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी बाजार समितीच्या उत्पन्नानुसार नेमण्याबाबत तरतूद केली आहे. राज्य कृषी पणन मंडळाकडून बाजार समित्यांना पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी अल्प दराने कर्ज दिले जाते. या कर्जाची वसुली करण्यासाठीची तरतूदही प्रस्तावित करण्यात आली आहे.

## देखरेख खर्चात वाढ करणार

बाजार समित्यांकडून देखरेख खर्च म्हणून शेकडा पाच पैसे आकारणी होते. ती वाढवून १० पैसे करण्याचा बदल प्रस्तावित आहे. हा बदल मान्य झाल्यास देखरेख खर्चापोटी मिळणारी रक्कम ही राज्य शासनास वाढवून मिळण्याची अपेक्षा आहे. पणन संचालनालयाच्या प्रस्तावावर मंत्रालयात कोणता निर्णय होणार, यास महत्त्व प्राप्त झाले आहे.

## कृषिमाल नसलेल्या जिनसांवर वापर आकार



बाजार समितीकडून बाजार घटकांना विविध सुविधा दिल्या जातात आणि त्यावर विशेष खर्चही केला जातो. त्यामध्ये अधिसूचित शेतमालावर एक टक्का बाजार फी (सेस) आकारण्यात येते, तर अधिसूचित नसलेल्या व कृषी उत्पन्न नसलेल्या शेतमालावर बाजार समितीला सेस मिळत नाही. त्यामुळे कृषिमाल नसलेल्या जिनसांवर सुविधा खर्च म्हणून 'वापर आकार' घेण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

लोकमत

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण कर्ज योजना

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : सुगीच्या कालावधीत शेतकऱ्यांची आर्थिक निकड लक्षात घेऊन राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या शेती मालाचा काढणी हंगाम सुरू झाल्यानंतर आर्थिक निकडीमुळे शेतीमाल विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात बाजारात येत आहे. आवक वाढल्याने भाव खाली येत आहेत.

योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. काढणी हंगामात शेतमालाची साठवणूक करून काही कालावधीनंतर बाजारपेठेत विक्रीस आणल्यास त्या शेतमालास जादा बाजारभाव मिळू शकतो. त्या अनुषंगाने शेतमाल तारण कर्ज योजना राबविली जात आहे. यात तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, धना, भात, करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा, हळद, काजू बी, बेदाणा व सुपारी या शेतमालाचा समावेश करण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत बाजार समितीच्या गोदामात माल तारण ठेवणाऱ्या शेतकऱ्यांना शेतमालाच्या किमतीच्या ७५ टक्के पर्यंत रक्कम सहा महिने कालावधीत सहा टक्के व्याज दराने तारण कर्ज देण्यात येणार आहे. शेतमाल तारण कर्ज योजनेंतर्गत केवळ उत्पादन शेतकऱ्यांचाच माल स्वीकारला जाणार आहे. व्यापाऱ्यांचा शेतमाल स्वीकारला जात नाही. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन शेतमाल तारण कर्जाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

## सहा टक्के व्याजदर

- प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किमत ही त्या दिवसाच्या बाजारभाव किंवा शासनाने जाहीर केलेली खरेदी किमत यापैकी जी कमी असेल ती, ठरविली जाते.
- तारण कर्जाची मुदत सहा महिने असून, तारण कर्जास व्याजाचा दर सहा टक्के असा आहे. बाजार समितीकडून कृषी पणन मंडळास तीन टक्के प्रमाणे कर्ज व्याजाची परतफेड केली जाते. उर्वरित तीन टक्के बाजार समितीस प्रोत्साहनपर अनुदान मिळते.

दै. "अॅग्रोवन" दि. १२/११/२०२१.

# मूल्यवर्धनाअभावी बसतोय प्रति टन पाच हजारांचा फटका

## कळमणा बाजार समितीत संत्रा ग्रेडिंग-कोटिंग प्रकल्पाचा अभाव

**विनोद इंगोले** : अॅग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : संत्र्यामुळे नागपूरला जागतिकस्तरावर ओळख मिळाली असतान्नाच येथील कळमणा बाजार समितीत मात्र पहिल्या टप्प्यातीलच ग्रेडिंग, कोटिंगची सुविधा नसल्याने शेतकऱ्यांना प्रति टनामागे तब्बल पाच हजार रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. पणन मंडळाने काही वर्षांपूर्वी बाजार समितीला याबाबतीत आर्थिक सहकार्य करण्याची तयारी दर्शविली होती. मात्र मध्येच राजकारण आल्याने शेतकरी हिताचा हा निर्णय अडगळीत पडला आहे.

संत्रा फळात बियांचे असलेले अधिक प्रमाण आणि त्या परिणामी ज्यूस उद्योगात वापर न होणे, तसेच टिकवणक्षमता देखील कमी असल्याने निर्यातीच्या देखील मर्यादा आहेत. त्या पार्श्वभूमीवर संत्र्याचे ग्रेडिंग आणि कोटिंग झाल्यास चकाकीमुळे दर्जा वाढतो आणि टिकवणक्षमता देखील वाढीस लागले. नागपूरचे तत्कालीन राजे मुधोजी भोसले (द्वितीय) यांना १८०९-१० या काळात दक्षिणेतील स्वारीवर असतांना संत्र्यांची दोन रोपे भेट स्वरूपात मिळाली होती. त्यानंतर या वाणात अपेक्षित संशोधन झाले नाही. परिणामी, टिकवणक्षमता कमी आहे. निर्यात करावयाची झाल्यास ग्रेडिंग आणि कोटिंग करणे क्रमप्राप्त ठरते. बाजार समितीतच ही सुविधा असल्यास शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे.

विशेष म्हणजे पशुसंवर्धन व दुग्ध विकासमंत्री सुनील केदार यांच्या गटाचेच या बाजार समितीवर सातत्याने वर्चस्व राहिले आहे. परंतु कोट्यवधी रुपयांची उलाढाल असणाऱ्या नागपूरच्या कळमणा बाजार समितीने याकडे दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका बसत आहे. बाजार समितीने ही सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने होत आहे. विशेष म्हणजे कळमणा बाजार समितीत प्रति दिवसाला ८०० ते ९०० टन संत्रा आवक होते.



**नागपूर जिल्ह्यात संत्रा व्यवहार होणाऱ्या बाजार समिती**

**नरखेड, कळमेश्वर, काटोल, नागपूर (कळमणा)**

"ग्रेडिंग आणि कोटिंग नसेल तर सरासरी पाच हजार रुपये प्रति टन याप्रमाणे कमी दर मिळतो. ग्रेडिंग, कोटिंग ही प्रक्रिया पहिल्या टप्प्यात पार पाडली गेल्यास फळ खरेदीदार कंपन्यांकडून चांगला दर मिळेल. ही सुविधा नसल्याने खासगी कंपन्यांसाठी खरेदी करणारे प्रतिनिधी नागपूरऐवजी अमरावती जिल्ह्याला पसंती देतात. कारण अमरावती जिल्ह्यात अशाप्रकारचे १४ प्रकल्प उभे राहिले आहेत. अकोला जिल्ह्यातील अकोट तसेच नागपूरच्या जलालखेडा भागात असा प्रकल्प आहे.

– **श्रीधर ठाकरे**, कार्यकारी संचालक, महाऑरेंज

"या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासूनच त्याच्या उभारणीसंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे. व्यापाऱ्यांची गरज नसेल म्हणून त्यांनी अशी मागणी आजवर केली नाही. त्यांच्याकडून मागणी आल्यास ग्रेडिंग, कोटिंग प्रकल्प उभारता येईल. लवकरच या विषयावर कळमणा बाजारातील व्यापाऱ्यांशी संवाद साधणार आहे.

– **सुनील केदार**, पशुसंवर्धन व दुग्ध विकासमंत्री, महाराष्ट्र

ॲग्रोवन
दि. 11/11/2021

# केळी निर्यातीला राज्याला मोठी संधी

चंद्रकांत जाधव


निर्यातक्षम केळी.

महाराष्ट्रातील शेतकरी निर्यातक्षम केळी उत्पादन घेत आहेत. सन २०२०-२१ मध्ये राज्यातून दोन लाख टन केळीची परदेशात निर्यात झाली. सरासरी १२०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. यंदाही किमान अडीच लाख टन निर्यात होण्याचे संकेत आहेत. देशातील बाजारातही राज्यातील केळीचा दबदबा वाढला आहे. उत्तर भारतातील बाजारपेठेत राज्यातील, किंबहुना खानदेशी केळीला बारमाही उठाव आहे. परदेशात निर्यातीसाठी मोठी संधी आहे. मात्र तेवढी पूर्ण होऊ शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे अधिकाधिक गुणवत्तापूर्ण उत्पादन व्हायला हवे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## आखातात वर्षभर मागणी

आखातात केळीला वर्षभर मागणी आहे. इराण, बहारीन, दुबई, अफगाणिस्तान, इराक येथे राज्यातून अधिक निर्यात दोन वर्षे होत आहे. निर्यातदार कंपन्यांच्या मदतीने युरोपातही निर्यातीचा प्रयत्न होत आहे. खानदेशातून सह्याद्री फार्म्सने इंग्लंडमध्ये तर एका कंपनीने इटलीत निर्यात केली. तुर्की येथूनही मागणी आहे.

## मागणीचे चित्र

- राज्यात एप्रिल ते ऑगस्ट या काळात आवक अधिक. याच काळात निर्यातही अधिक.
- उत्तर भारतातही मागणी. किमान ११०० ट्रक प्रतिदिन (एक ट्रक १६ टन क्षमता) आवक या काळात. दिल्ली, पंजाब, काश्मीर, उत्तर प्रदेशात उठाव. • नोव्हेंबर ते जानेवारी सुरुवातीपर्यंत आवक कमी. या काळात राज्यात ५०० ट्रक प्रतिदिन आवकेचे नोंद. • अलीकडे खानदेश व सोलापूर भागांत बारमाही आवक सुरू.
- राज्यातून २०२०-२१ मध्ये परदेशातील निर्यातीत खानदेशातून सुमारे ७० हजार टन निर्यात. यापाठोपाठ सोलापूर, कोल्हापूर व अन्य भागांचा हिस्सा. • निर्यातवाढीसाठी क्लस्टरची घोषणा शासनाने केली. त्यात कोल्हापूर, सोलापूरचा समावेश आहे. त्याद्वारे निर्यात वाढू शकण्याचा अंदाज.

राज्यातील केळीला मोठा उठाव आहे. दिल्ली, पंजाब येथील मॉलमध्ये केळीची खानदेशातून बारमाही पाठवणूक केली जात आहे. यासाठी निर्यातक्षम केळीची आवश्यकता असते. खानदेशातून तेथे एप्रिल ते ऑगस्टदरम्यान प्रतिदिन २०० ते २२५ ट्रक केळीची पाठवणूक केली जाते. केळीचे थेट शेतात स्वच्छता, प्रतवारी व बॉक्समध्ये पॅकिंगची कार्यवाही केली जाते. तर काही खरेदीदार, एजंट पॅक हाउसमध्ये प्रतवारी, स्वच्छता व पॅकिंगची कार्यवाही करतात.

## बाजारातील स्थिती

दोन वर्षांतील कोरोना काळात परदेशात कंपन्या, शेतकरी गट, प्रशासनाच्या मदतीने निर्यात सुरू होती. वाहतुकीसंबंधी अडथळे होते. पण मागणी कायम राहीली. या काळात ८०० ते ९०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. त्याहूनही दर घसरले होते. देशातही काही भागात वाहतूक सुरू असल्याने अन्य शेतीमालासारखे नुकसान केळी उत्पादकांना सहन करावे लागले नाही.

ऑगस्ट ते डिसेंबरपर्यंत आंध्र प्रदेश, गुजरातमधून आवक अपवादानेच होते. या काळात खानदेश, सोलापुरात आवक सुरू असते. हा काळ सणासुदीचा असल्याने केळीला उठाव असतो. दरही टिकून असतात. ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये सणासुदीमुळे तसेच रमझान ईद, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, पितृपक्ष यामुळे मागणी कायम राहिली. केळीला राजस्थान, नागपूर, कल्याण, ठाणे, छत्तीसगड आदी भागांत उठाव असतो. या भागातील केळी पिकवणी केंद्रचालकांकडून खरेदी मोठ्या प्रमाणात होते.

## नामांकित कंपन्यांकडून निर्यात

खासगी कंपन्यांकडून निर्यातीसाठी चार आधुनिक किंवा फिलिपिन्सच्या धर्तीवर पॅकहाउस उभारण्यात आले आहेत. शेतकऱ्यांचेही त्यात योगदान आहे. एक पॅकहाउस जळगाव जिल्ह्यात तांदलवाडी व एक सोलापुरात आहे. जळगाव जिल्ह्यात मध्यंतरी अमेरिकेतील डोल, चिकिता या नामांकित कंपन्यांनी निर्यातीसाठी काम केले.

## कोविडनंतर संधी

कोविडकाळ बऱ्यापैकी संपत आल्यानंतर बाजार बऱ्यापैकी खुला झाला. दिल्ली येथील आशिया खंडातील सर्वांत मोठे आझादपूर मार्केट २४ तास कार्यरत झाले आहे. यामुळे दरांवरील दबाव देशात फारसा असणार नाही. फिलिपिन्समध्ये केळी पिकात रोगराई वाढली आहे. तेथून २०२० मध्ये पावणेतीन लाख टनांनी परदेशातील निर्यात घटली आहे. याचा लाभ भारतीय केळीला पुढे होईल. येत्या काळात राज्यात लागवड वाढून ८५ हजार हेक्टरवर जाईल असे संकेत आहेत.

## थेट खरेदीचा लाभ

केळीची खरेदी खरेदीदार थेट शिवारात करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना वाहतूक व अन्य अडचणींचा सामना करावा लागत नाही. थेट खरेदीसाठी पाणंद रस्ते विकास कार्यक्रमाचा लाभही होत आहे. अनेक भागांत शेतरस्ते मजबूत खडी टाकून तयार केले जात आहेत. शेतकऱ्यांनी स्वनिधी, लोकवर्गणीतून रस्त्यांची कामें केली आहेत. काढणीनंतर पुढील जबाबदारी खरेदीदाराची असते. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत नाही.

**राज्यातील लागवड (हजार हेक्टरमध्ये).**

२०१९........ ८३
२०२० ....... ८०
२०२१ ....... ८५ (अपेक्षित)

दै. "ॲग्रोवन" दि. १/११/२०२१.

# सांगली मार्केट यार्डात हळद-गूळ सौद्यांना प्रारंभ

ॲग्रोवन वृत्तसेवा

सांगली : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर गूळ आणि हळदीच्या नवीन हंगामाच्या सौद्यांना प्रारंभ झाला. मुहूर्ताच्या सौद्यात गुळाला उच्चांकी ३९५१ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. तर हळदीला साडेआठ हजार ते नऊ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. मुहूर्ताच्या सौद्यात चांगला दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

मार्केट यार्डात प्रतिवर्षी दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर गूळ आणि हळदीच्या नवीन हंगामाच्या सौद्यांना प्रारंभ होतो. मुहूर्ताच्या सौद्याकडे शेतकरी, व्यापारी आदींचे लक्ष लागलेले असते. बाजार समितीचे सभापती दिनकर पाटील यांच्या हस्ते या सौद्यांचा प्रारंभ झाला. सौद्यात गुळाला उच्चांकी ३९५१ रुपये प्रति क्विंटल इतका दर मिळाला. गुळाचा दर पहिल्याच सौद्याला ३४०० ते ३९५१ रुपये इतका राहिला. पहिल्या दिवशी १५०० पोत्यांचे सौदे झाले. हळदीच्या सौद्यालाही उत्साहात



सुरवात झाली. हळदीला सहा हजार ते नऊ हजार रुपये प्रति क्विंटलइतका दर मिळाला. मुहूर्तावर बेदाणा सौद्यास देखील प्रारंभ झाला.

सभापती श्री. पाटील, सचिव महेश चव्हाण, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष शरद शहा, गूळ व्यापारी संघटनेचे हरीश पाटील, हळद व्यापारी सतीश पटेल, मनोहर सारडा, गोपाळ मर्दा, शरद पाटील, बेदाणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कुंभार, मनोज मालू, शेखर ठक्कर, पणू सारडा, रूपेश पारेख, अभिजित पाटील आदींसह अडते, व्यापारी, शेतकरी, खरेदीदार, हमाल उपस्थित होते.

पुढारी

# शेतकऱ्यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा

## सभापती बन्नाळीकर यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**धर्माबाद, पुढारी वृत्तसेवा :** घसरत्या बाजारभावाची चिंता न करता शेतकऱ्यांनी योग्य भाव आपल्या शेतमालास येईपर्यंत आर्थिक चणचण भागवायची असेल तर शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन धर्माबाद बाजार समितीचे नूतन सभापती रामचंद्र पाटील बन्नाळीकर यांनी धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना केले.

आजघडीला शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळणे दुरापास्त झाले आहे. हमीभाव असूनही मालाची गुणवत्ता निकषपूर्ण नसल्याचे निमित्त पुढे करून शेतकऱ्याची आर्थिक कोंडी होत आहे व त्यांचा शेतमाल हा कमीत कमी किमतीत कसा खरेदी केला जात आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकाराला घाबरून न जाता घसरत्या बाजार भावाची नको मनात भीती, शेतमाल तारण कर्ज योजना आहे. याप्रमाणे शेतकऱ्यांच्या शेतमाल तारण कर्ज योजना पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे.

सदरील योजनेची खास वैशिष्ट्य म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत असते, बाजार समितीच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालावर शेतकऱ्यांना तारण कर्ज त्वरित उपलब्ध होते.

कर्जाची मुदत ही सहा महिने म्हणजेच १८० दिवस असून कर्जाचा व्याजदर केवळ सहा टक्के वार्षिक आहे. सहा महिन्यांच्या कार्यकाळात आपल्या शेतमालाला जर योग्य भाव मिळाला तर शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी काढू शकतात. सदरील योजनेत सोयाबीन, तूर, मूग, उडीद, भात, (साळी) करडई, सूर्यफूल, ज्वारी, बाजरी, मका, गहू, हरभरा, हळद आदी पिकांचा समावेश आहे. प्रचलित बाजारभाव किंवा किमान आधारभूत किंमत यापैकी कमी असेल त्या दराने होणाऱ्या एकूण किमतीच्या कमाल ७५ टक्के रक्कम ही तारण कर्जाची मर्यादा आहे.

> धर्माबाद बाजार समिती हक्काची सर्वसुविधायुक्त सुसज्ज गोदामे उपलब्ध असून, तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपला शेतमाल हा कमीत भावात विकण्यापेक्षा या योजनेत बाजार समितीच्या सुरक्षित गोदामात शेतमाल तारण ठेवून कर्ज योजनेचा फायदा व लाभ घ्यावा. ज्यामुळे बाजारात भाववाढ झाली की आपला शेतमाल त्यावेळी विक्री करावा. त्यामुळे बाजारात भाव पडल्यावर होणारे नुकसान सहजरीत्या टाळता येईल, असे आवाहन धर्माबाद बाजार समितीचे सभापती राम पाटील बन्नाळीकर व सचिव चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

My Nanded Edition
Nov 2, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

दै. सकाळ दि. २/१२/२०२१. (औरंगाबाद - लातूर आवृत्ती)

# शेतमाल तारण योजनेचा लाभ घ्यावा

## सभापती सिद्धेश्वर पाटील यांचे आवाहन



सिद्धेश्वर पाटील

उदगीर, ता. १ (बातमीदार) : तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक अडचण असल्यास त्यांनी शेतमाल कमी दरात न विकता उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीने सुरू केलेल्या शेतमाल तारण कर्ज योजनेत शेतमाल तारण ठेवावा, असे आवाहन सभापती सिद्धेश्वर ऊर्फ मुन्ना पाटील यांनी केले आहे.

उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. आर्थिक अडचण असलेल्या शेतकऱ्यांना शेतमालाचे भाव कमी असताना कवडीमोल दरात शेतमाल विक्री करण्याची गरज नाही. त्यासाठी उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतमाल तारण कर्ज योजना सुरू केलेली आहे. याचे उद्‌घाटन नुकतेच करण्यात आले. या योजनेअंतर्गत तालुक्यातील पात्र शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेत शेतकऱ्यांकडून शेतमाल तारण ठेवण्यासाठी गोदाम भाडे आकारले जात नाही. सोयाबीन, तूर, मूग व उडीद तारण ठेवल्यास शेतमालाच्या गुणवत्तेनुसार तथा ग्रेडिंगनुसार बाजारातील चालू दराच्या ७५ टक्के रक्कम कर्ज भरून शेतकऱ्यांना त्वरित दिली जाते. शेतमाल तारण कर्ज योजनेत व्याजदर दसादशे. ६ टक्के इतक्या अल्प दराने प्रथम सहा महिने कालावधी करता उपलब्ध असेल. तरी गरजूंनी शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुन्ना पाटील यांनी केले आहे.

यावेळी उपसभापती रामराव बिरादार, सचिव भगवान पाटील, संचालक कल्याण पाटील, पद्माकर उगिले, धनाजी जाधव, रमेश पाटील तपश्याळकर, संतोष बिरादार, सुभाष धनुरे, बालाजी पाटील, संभाजी ढोगरे, शांतीवीर मुळे, गुरुनाथ बिरादार, रामदास काळगापुरे, कुमार पाटील, शिवाजी लकवाले, गजानन बिरादार, सतीश पाटील मानकीकर आदी उपस्थित होते.